दिनांक :— १८.०८.२०२१

## प्रेसनोट

**लोकसेवक श्री चंद्रशेखर रामनारायण वाजपेयी, स्वीयसहायक, वर्ग—३, नेमणुक अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय जिल्हा परिषद हिंगोली यांनी ३०,०००/— रू. लाचेची मागणी करून लाच स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेतले बाबत...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक १८.०८.२०२१ रोजी तक्रार दिली होती की, त्यांनी ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग हिंगोली येथुन पंचायत समिती औंढा ना. येथे पदस्थापना बदलुन मिळणे बावत विनंती अर्ज सादर केला होता. सदर पदस्थापना बदलुन मिळणे बाबतचे संचिकेवर मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली यांचेकडे सादर करून त्यावर त्यांची सही घेवुन पदस्थापना बदलुन दिल्याचा मोबदला म्हणुन लोकसेवक चंद्रशेखर वाजपेयी, स्वीयसहायक जिल्हा परिषद हिंगोली. हे ३०,०००/— रू लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक १८.०८.२०२१ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक चंद्रशेखर वाजपेयी, स्वीयसहायक जि.प.हिंगाली यांनी तक्रारदार यांना ३०,०००/— रू. ची लाचेची मागणी केली. त्यावरून दिनांक १८.०८.२०२१ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक चंद्रशेखर रामनारायण वाजपेयी यांनी अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली याचे कार्यालयात तक्रारदारा कडून १७.५० वाजताचे सुमारास लाचेची रक्कम स्विकारली. त्यावरून लोकसेवक चंद्रशेखर वाजपेयी स्वीयसहायक, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी कार्यालय जि.प.हिंगोली यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री निलेश सुरडकर, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोना महारूद्रा कबाडे, पोना श्री. ज्ञानेश्वर पंचलिंगे, पोना श्री तान्हाजी मुंढे, चापोना श्री सरनाईक ॲ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी ॲन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी ॲन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.—१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६—२२३०५५,

**मोबाईल क्रमांक :—** ९८२२२००९५९